सुनेत्रांविरुद्ध उमेदवार देण्याचा काँग्रेसला हक्क

संजय राऊत यांच्याकडून समर्थन; पार्थ पवारांवर टीका

मुंबई : बारामती पोटनिवडणुकीसाठी सुनेत्रा पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर महाराष्ट्रातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. त्यांच्या विरोधात उमेदवार उभा करण्याच्या काँग्रेसच्या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांमध्ये शाब्दिक युद्ध सुरू झाले असून, शिवसेना (यूबीटी) खासदार संजय राऊत यांनी काँग्रेसच्या निवडणूक लढवण्याच्या अधिकाराचे ठामपणे समर्थन केले आहे.

काँग्रेसचा निवडणूक लढवण्याचा निर्णय हा 'महाराष्ट्रातील त्यांच्या अधोगतीची सुरुवात' असल्याचे विधान राष्ट्रवादीचे खासदार पार्थ पवार यांनी केले होते. यावर प्रत्युत्तर देताना संजय राऊत यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या भूमिकेशी सहमती दर्शवली. पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले, 'मी शरद पवारांशी सहमत आहे. काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे आणि त्यांना निवडणूक लढवण्याचा पूर्ण अधिकार आहे.'

पार्थ पवारांच्या टीकेतील विरोधाभास अधोरेखित करताना राऊत यांनी त्यांना अलीकडच्या इतिहासाची आठवण करून दिली. 'लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर पिंपरी-चिंचवडची पोटनिवडणूक पार्थचे वडील अजित पवार यांनी काँग्रेसच्या मदतीनेच लढवली होती. जर ते तेव्हा मदत घेऊ शकतात, तर आता काँग्रेसने निवडणूक का लढवू नये?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यापूर्वी शरद पवार यांनीही पार्थ यांच्या वक्तव्याची दखल न घेता, 'मोठ्या राजकीय निर्णयांवर मते व्यक्त करण्यासाठी 'परिपक्वता' लागते,' असे सांगून त्यांना टोला लगावला होता.

हे वादाचे लोण बारामतीपलीकडे राहुरी मतदारसंघापर्यंत पोहोचले आहे, जिथे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे (राष्ट्रवादी - शरद पवार गट) यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. काही लोक असा दावा करत आहेत की तनपुरे यांचे 'मन वळवण्यात" आले, मात्र राऊत यांनी यामागे एक वेगळीच शक्यता वर्तवली आहे. 'आजच्या राजकारणात कोणी कोणाचे 'मन वळवत' नाही; तर धमकावले जाते,' असा आरोप राऊत यांनी केला.

भाजप नेते राधाकृष्ण विखे पाटील आणि रवींद्र चव्हाण यांच्या सहभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत ते म्हणाले, 'हे काय मोठे क्रांतिकारक किंवा स्वातंत्र्यसैनिक आहेत का? ते बहुधा साखर कारखाने आणि सहकारी बँकांच्या फायली घेऊन त्यांना घाबरवण्यासाठी गेले असतील. जे या धमक्यांना घाबरतात ते माघार घेतात, पण ज्यांना राजकारणात टिकून राहायचे आहे त्यांना संघर्ष करावाच लागेल. जर तुम्हाला लढायचे नसेल, तर भाजपचे गुलाम म्हणून जगा.' राऊत यांनी पुढे ठामपणे सांगितले की, त्यांचा पक्ष भाजपच्या 'हुकूमशाही' तंत्राला घाबरत नाही. 'ही लोकशाही आहे, 'ट्रम्प-शाही' नाही,' अशी टिप्पणी त्यांनी केली.

काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांच्याबाबत राऊत यांनी एक महत्त्वाची अट उघड केली. 'अजित पवार यांच्याशी संबंधित संशयास्पद अपघाताबाबत महाराष्ट्रात एफआयआर नोंदवला गेला, तर आम्ही आमच्या उमेदवाराची माघार घेण्याबाबत विचार करू, असे काँग्रेसने स्पष्ट केले आहे,' असा दावा त्यांनी केला.

अधिकृत पाठिंबा नाही

महाविकास आघाडीची भूमिका स्पष्ट करताना राऊत म्हणाले की, पवार कुटुंबाबद्दल वैयक्तिक सद्भावना असली तरी, महाविकास आघाडीतील कोणत्याही घटक पक्षाने अधिकृतपणे सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिलेला नाही. कौटुंबिक कारणास्तव शरद पवार यांनी उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला असला तरी, शिवसेना ठाकरे गट अद्याप यावर विचार करत आहे. उद्धव ठाकरे लवकरच पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट करतील, असे राऊत यांनी संकेत दिले. 'बारामतीची निवडणूक कदाचित नेहमीच्या मोठ्या गाजावाजाविना पार पडेल. बारामतीचे मतदार सुज्ञ आहेत; ते मतपेटीतून शांतपणे आपली भूमिका मांडतील,' असेही ते म्हणाले.

चीनमध्ये इंधन दरात पुन्हा वाढ

इंधन संकट गडद होण्याची भीती

बीजिंग : पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने चीनमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ करण्यात आली आहे. १५ दिवसांच्या कालावधीत झालेली ही दुसरी दरवाढ असून यामुळे सर्वसामान्यांच्या खिशावर भार पडणार आहे. राष्ट्रीय विकास आणि सुधारणा आयोगाने (एनडीआरसी) मंगळवारी यासंदर्भात घोषणा केली असून नवीन दर बुधवारपासून लागू होणार आहेत.

एनडीआरसीने दिलेल्या माहितीनुसार, पेट्रोलच्या दरात प्रति टन ४२० युआन (६१ डॉलर) आणि डिझेलच्या दरात प्रति टन ४०० युआन (५८ डॉलर्स) वाढ करण्यात आली आहे. मार्चच्या अखेरीस कच्च्या तेलाच्या किमतीत मोठ्या प्रमाणात चढ-उतार पाहायला मिळाले. यापूर्वी २३ मार्च रोजी चीनने इंधन दरात वाढ केली होती. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे निर्माण होऊ शकणाऱ्या इंधन संकटाचा सामना करण्यासाठी ही तयारी असल्याचे सांगण्यात येत आहे.

देशातील इंधनाचा पुरवठा विस्कळीत होऊ नये यासाठी चीनमधील प्रमुख तीन तेल कंपन्यांना उत्पादन सुरू ठेवण्याचे आणि वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

चीन पेट्रोलियम कॉर्पोरेशन, चीन पेट्रोकेमिकल कॉर्पोरेशन आणि चीन नॅशनल ऑफशोअर ऑईल कॉर्पोरेशन या कंपन्यांनी बाजारपेठेतील स्थिरता राखण्यावर भर द्यावा, असे एनडीआरसीने स्पष्ट केले आहे.

चिनी सरकार इंधन दराबाबतच्या धोरणांचे काटेकोर पालन व्हावे यासाठी बाजारपेठेतील देखरेख आणि तपासणी वाढवणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून बाजारपेठेत सुसूत्रता राखण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, अशी माहिती अधिकृत वृत्तसंस्थेने दिली आहे.

चीनमध्ये तेलाची ७० टक्के आयात

चीन आपल्या गरजेच्या ७० टक्के कच्चे तेल आयात करतो, ज्यातील सुमारे ३० टक्के तेल पुरवठा हा हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून होतो. त्यामुळे या भागात होणाऱ्या संघर्षाचा चीनच्या ऊर्जा सुरक्षेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

बंगाल मतदारयादीतून ९१ लाख नावे वगळली

निवडणूक आयोगाची मोठी कारवाई

कोलकाता : पश्चिम बंगालमध्ये राबवण्यात आलेल्या 'विशेष सखोल पुनरीक्षण' (एसआयआर) मोहिमेनंतर राज्यातील मतदार यादीतून सुमारे ९१ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या ताज्या आकडेवारीतून ही माहिती समोर आली आहे. या प्रक्रियेनंतर राज्याचा सुधारित अंतिम मतदार आकडा किती असेल, याची अधिकृत घोषणा निवडणूक आयोगाकडून अद्याप होणे बाकी आहे.

२८ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये एसआयआर प्रक्रिया सुरू झाल्यापासून ६३.६६ लाख नावे वगळण्यात आली होती. यामुळे राज्याचा ७.६६ कोटींचा मतदार वर्ग कमी होऊन ७.०४ कोटींवर आला होता. ७.०४ कोटी मतदारांपैकी ६०.०६ लाख मतदारांची नावे 'न्यायाधीन' श्रेणीत ठेवण्यात आली होती.

न्यायालयीन अधिकाऱ्यांनी केलेल्या छाननीनंतर या ६०.०६ लाख नावांपैकी २७.१६ लाख नावे वगळण्यात आली, तर उर्वरित ३२.६८ लाख नावे वैध ठरवून अंतिम यादीत कायम ठेवण्यात आली आहेत. एकूणच एसआयआर प्रक्रिया सुरू झाल्यापासून आतापर्यंत ९०.८३ लाख (सुमारे ९१ लाख) मतदारांची नावे कमी करण्यात आली आहेत.

निवडणूक आयोगाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, 'पुनरीक्षण प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि टप्प्याटप्प्याने राबवण्यात आली आहे. जबाबदारी निश्चित करण्यासाठी आता जिल्हावार आकडेवारी सार्वजनिक करण्यात आली आहे. 'प्रशासकीय औपचारिकता आणि ई-स्वाक्षरी पूर्ण झाल्यानंतर, वगळण्यात आलेल्या किंवा नव्याने समाविष्ट केलेल्या नावांच्या संख्येत किरकोळ बदल होऊ शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ठराविक समुदायांना वगळले - ममता

कोलकाता : पश्चिम बंगालमधील 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' (एसआयआर) प्रक्रियेनंतर मतदार यादीतून ठरावीक समुदायांच्या लोकांची नावे हेतुपुरस्सर वगळण्यात आल्याचा खळबळजनक आरोप मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी केला. नदिया जिल्ह्यातील चकदाहा येथे आयोजित एका निवडणूक सभेत बॅनर्जी म्हणाल्या की, ज्या लोकांची नावे मतदार यादीतून काढली गेली आहेत, त्यांच्या पाठीशी तृणमूल काँग्रेस खंबीरपणे उभी राहील. ठराविक समुदायांना लक्ष्य करून त्यांची नावे अधिकृत नोंदींमधून हटवली जात आहेत. निवडणूक आयोगाच्या ताज्या आकडेवारीनुसार, पश्चिम बंगालमध्ये एसआयआर प्रक्रियेनंतर सुमारे ९१ लाख मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत.

सर्वोच्च न्यायालयाची भूमिका

या प्रकरणातील पुढील कायदेशीर प्रक्रिया आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांवर अवलंबून असेल. पश्चिम बंगालमधील एसआयआर प्रकरणाची पुढील सुनावणी सर्वोच्च न्यायालयात १३ एप्रिल रोजी होणार आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई-निविदा सूचना क्र./१२/२०२६ (शुध्दीपत्रक)

दि. १३/०३/२०२६ रोजी **दै. नवशक्ती, मुंबई या** वृत्तपत्रात निविदा सुचना क्र. १२ सन २०२६ मधील कामाची (अंदाजित रक्कम रू. ३७,७८,८०,४५१/-) कोरीई-निविदा **www.mahatender.gov.in** या संकेतस्थळावर **दि. ०८/०४/२०२६ ते दि. ०४/०५/२०२६** या कालावधीत उपलब्ध होतील. या व्यतिरिक्त निविदा सूचनेमधील इतरबाबींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सार्वजनिक सूचना

सर्व संबंधित व्यक्ती, ज्यात बोनाफाईड रहिवासी, पर्यावरण गट, एन जी ओ आणि इतरांना सूचित केले जाते की राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (एस ई आय एए) महाराष्ट्र यांनी मेसर्स पॅराडाईज लाइफस्टाइल्स प्रायव्हेट लिमिटेड ला पर्यावरणीय मंजुरी दिली आहे. प्लॉट नंबर ६ (पी), ७ आणि ८, पत्रक क्रमांक ९२, ९३ आणि ९४, सीटीएस क्रमांक १६१८, १६१९ए, १६२५, १६२६ए, उल्हासनगर- १.

महाराष्ट्र फाईल क्रमांक : एस आई ए/ एम एच/ इन्फ्रा २/ ५६१७०४/ २०२६ अंतर्गत
मंजुरी पत्राची प्रत महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध आहे आणि ती पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या https://parivesh.nic.in या वेबसाइटवरही पाहता येईल.

मेसर्स पॅराडाईज लाइफस्टाइल्स प्रायव्हेट लिमिटेड.

साइटचा पत्ता:- "साई वर्ल्ड लीजेंड", ६ (पी), ७ आणि ८, पत्रक क्रमांक ९२, ९३ आणि ९४, सीटीएस क्रमांक १६१८, १६१९ए, १६२५, १६२६ए, उल्हासनगर- १.
कॉर्पोरेट पत्ता: १७०१, सत्रा प्लाझा, प्लॉट क्रमांक १९ आणि २०, सेक्टर १९ डी, वाशी नवी मुंबई ४००७०५.

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public at large that Mrs. Hafeeza Yakub Lakhani and Mrs. Rahila Sharique Lakhani residing at 902/903, B Fatima Apartments, 107 Morland Road, Mumbai Central, Mumbai, Maharashtra - 400008 has agreed to purchase Flat No. 3101 admeasuring 1324.10 Sq. ft., situated on 31st floor of the tower TERRA, together with two car parking spaces under stilts bearing no. 74 and 85 each admeasuring 111.37 sq. ft. situated on the portion of freehold plot of land bearing Cadastral Survey No. 1960 (part) 72 of Byculla Division in the Registration District and Sub-District of Bombay City at Mahalaxmi, Mumbai-400011 from Mr. Mahbahkt Kotwal, and Mrs. Aparna Kotwal.

All persons having or claiming any right, title, interest, claim, lien, charge, mortgage, lease, easement, inheritance, trust, attachment, or any other encumbrance whatsoever in respect of the said flat or any part thereof are hereby required to make the same known in writing, along with documentary evidence, to the undersigned within 14 (fourteen) days from the date of publication of this Notice.

If no claims are received within the stipulated period, it shall be presumed that there are no claims or objections and the purchaser shall proceed with the transaction, and any such claims, if any, shall be deemed to have been waived.

Advocate for the Purchaser
Name: Yasmin A. Shaikh
Address: Office No. 4, Beaumon Chambers, Nagindas Master Road, Fort, Mumbai - 400 001.
Contact No. 9867134786.

Date : 08.04.2026
Place : Mumbai

जाहीर सूचना

सूचित करण्यात येते की, विक्रेते म्हणजे **श्री. सागर प्रबोध शाह आणि श्रीमती शैला सागर शाह** यांनी आमच्या पक्षकारांना विक्री व हस्तांतरण करण्याचा मानस व्यक्त केला असून आमचे पक्षकार औद्योगिक जागा खरेदी करण्यास इच्छुक आहेत, जी पुढे दिलेल्या परिशिष्टात अधिक तपशीलवार वर्णन केलेली असून सर्व प्रकारच्या बोजांपासून मुक्त आहे.

सदर मालमत्तेबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत विक्री, भाडेपट्टा, लीव्ह अँड लायसन्स, भार, धारणा, लिस पेन्डेन्स, वारसा, गहाण, भेट, देवाणघेवाण, विश्वस्त, वसीयत, देखभाल, भाडेकरार, सुविधाधिकार, ताबा, वापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा, हक्क किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्ती/संस्था/निगम/वित्तीय संस्था/राज्य किंवा केंद्र शासन यांना याद्वारे सूचित करण्यात येते की त्यांनी त्यासंबंधी सर्व नोटरीकृत कागदपत्रांसह लेखी स्वरूपात खाली सही करणाऱ्यास त्यांच्या कार्यालयात, पत्ता - **ऑफिस क्र. १, १ ला मजला, मेहता बिल्डिंग, नगिनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१** येथे, या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कळवावे, अन्यथा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व अशा कोणत्याही दाव्याचा विचार न करता तो त्याग केलेला व/किंवा सोडून दिलेला समजला जाईल व आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

वरील संदर्भित परिशिष्ट:

रु. ५०/- प्रत्येक किंमतीच्या **दहा** पूर्ण भरलेल्या शेअर्सचे, वैशिष्ट्यांकित क्रमांक **१३१ ते १४०** (दोन्ही समाविष्ट), असे शेअर्स असलेले शेअर प्रमाणपत्र क्र. २५ दिनांक ३०-०९-१९९६ असलेल्या **''श्री लक्ष्मी कृपा इंडस्ट्रियल प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड''** (नोंदणी क्र. बीओएम/डब्ल्यू-के/डब्ल्यू/जीएनएल-१९८७/१९९१-९२) या सोसायटीचे, तसेच सदर जागेचा वापर करण्याचा हक्क, क्षेत्रफळ ८८० चौ. फूट (सुमारे **८१.७५** चौ. मीटर) कार्पेट क्षेत्र असलेली **गाळा क्र. ६-एल**, तळ मजल्यावर, **''श्री लक्ष्मी कृपा इंडस्ट्रियल प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड''** या इमारतीत, पत्ता - फेज क्र. २, ४ व ६, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३ येथे स्थित, तसेच महसूल गाव ओशिवरा, तालुका अंधेरी येथील सी.टी.एस. क्र. ६२७ असलेल्या जमिनीवर उभे असलेले व नोंदणी जिल्हा व उप-नोंदणी जिल्हा मुंबई उपनगर यांच्या हद्दीत असलेले.

दिनांक: ८ एप्रिल २०२६

मे. शाह अँड फुरिया असोसिएट्स यांच्यासाठी
सही/-
भागीदार
अधिवक्ता व सॉलिसिटर

कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. II, मुंबई येथे

३रा मजला, कुलाबा, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, मुंबई-४०० ००५.

विक्रीची उद्घोषणा मांडण्याकरिता सूचना

दि रिकव्हरी ऑफ डेब्ट्स अँण्ड बँक्रप्टसी ॲक्ट १९९३ सहवाचता दि सेकंड शेड्युल टू दि इन्कम टॅक्स ॲक्ट १९६१ च्या नियम ५३ अन्वये विक्री उद्घोषणा मांडण्याकरिता सूचना

निशाणी क्र. २३
आरपी क्र. ३७६ सन २०१७ — **पुढील दिनांक: १७/०४/२०२६**
आयडीबीआय बँक .....**अर्जदार**
विरुध्द
श्री. अभिराज नंद प्रसाद .....**प्रतिवादी**

प्रति,
अभिराज नंद प्रसाद, फ्लॅट क्र. १ आणि २, तळ मजला, ए-विंग, सेक्टर २०, प्रीती कॉम्प्लेक्स, ऐरोली, नवी मुंबई : ४००७०८. (पर्यायी पत्ता येथे आहे : इंद्रप्रस्थ बी-३०, अणुशक्ती नगर, मुंबई-४०००९४) ... **प्रमाणपत्र कर्जदार**

ज्याअर्थी सन्माननीय पीठासिन अधिकारी, **कर्ज वसूली न्यायाधिकरण क्र. २, मुंबई** याद्वारे मंजूर **ओ.ए. क्र. १३०/१२** मधील आयबीआयडी **वसुली प्रमाणपत्र क्र. ३७६ सन २०१७** निर्गमित केले होते. निम्नस्वाक्षरीकारांनी खालील नमूद स्थावर मिळकतीच्या विक्रीचे आदेश दिले.

तुम्हाला याद्वारे कळविण्यात येते की विक्रीची उद्घोषणा काढणे आणि तिच्या अटी मांडण्याकरिता **१७/०४/२०२६ रोजी दु. २.३० वा.** ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. तुम्हाला उद्घोषणा मांडणीमध्ये सहभागी होण्याकरिता आणि सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागाशी संबंधित कोणताही बोजा, प्रभार, दावे किंवा दायित्वे निम्नस्वाक्षरीकारांना कळविण्यासाठी याद्वारे बोलाविण्यात येत आहे.

मिळकतीचा तपशील

फ्लॅट क्र. ००१, मोजमापीत क्षेत्रफळ ४६० चौ.फूट आणि फ्लॅट क्र. ००२ मोजमापीत क्षेत्रफळ ५६५ चौ.फूट, तळ मजला, ए-विंग, ''प्रीती कॉम्प्लेक्स'' नावाच्या ज्ञात इमारतीत, प्लॉट क्र. ८डी, ऐरोली गावाचा भाग, ता. व जि. ठाणे येथे स्थित.

माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या **०१/०४/२०२६** रोजी दिले.

सही/-
श्री. चेतन जे. भिमगाडे
वसुली अधिकारी,
डीआरटी-२, मुंबई

शिक्का

प्रति,
१. वीज विभाग
२. एमआयडीसी/तलाठी/सिडको/बीएमसी- स्थानिक प्राधिकरण
३. आयकर, जीएसटी इ.

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया / Central Bank of India — CENTRAL TO YOU SINCE 1911

ठाणे पश्चिम-शाखा
प्लॉट क्र. ३८३/३८४, पॅराडाईज हाईट्स, स्टेशन रोड, ठाणे पश्चिम महाराष्ट्र-४००६०१

कब्जा सूचना (नियम ८(१)) स्थावर मिळकत करिता

याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार **सेंट्रल बँक ऑफ इंडिया चे** प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ ऑफ २००२) आणि कलम १३ (१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून सदर अधिनियमच्या कलम १३ (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, सदर कायद्याच्या कलम १३ (२) अन्वये जारी केलेली मागणी सूचना दिनांक **३०/११/२०२४** (जी फ्री प्रेस जर्नल आणि नवशक्तीमध्ये दिनांक ०३.०१.२०२५ रोजी प्रकाशित झाली होती) मागणी सूचना जारी करून कर्जदार श्री. शेख मोहम्मद युसुफ, राहणार फ्लॅट क्रमांक १०२, हाऊस क्रमांक ७०५/१, फातिमा मंझिल, शाहबाज गाव, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, जिल्हा-ठाणे, पिन - ४००६१४ यांना सदर सूचनेमध्ये नमूद केलेली एकूण रक्कम **रु. २४,२३,४५०.३६/- (रुपये चोवीस लाख तेवीस हजार चारशे पन्नास आणि छत्तीस पैसे मात्र)** तसेच त्यावरील व्याज, सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्यास सांगण्यात होते.

कर्जदार रकमेची परतफेड करण्यास कर्जदार आणि असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा **प्रत्यक्ष कब्जा** त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर ॲक्टच्या कलम १३ च्या उप-कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये या **०६ एप्रिल २०२६** रोजी घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा **सेंट्रल बँक ऑफ इंडिया, प्लॉट क्रमांक ३८३/३८४, पॅराडाइज हाइट्स, स्टेशन रोड, ठाणे (वेस्ट) - ४०० ६०१, यांचेकडे रु. २४,२३,४५०.३६/- (रुपये चोवीस लाख तेवीस हजार चारशे पन्नास आणि छत्तीस पैसे मात्र) इतक्या रकमेबाबत तसेच त्यावरील व्याजासह.**

तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात सदर ॲक्टचे कलम (१३) चे उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेतले जाते.

मिळकतीचे वर्णन

सदर मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग म्हणजे फ्लॅट क्रमांक २०२, २रा मजला, गणेश कृपा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, प्लॉट क्र. ३७-बी, सेक्टर -३, उलवे येथे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र, पिन -४१०२०६ येथे स्थित, क्षेत्रफळ मोजमापित ३३.१७ चौ. मीटर बांधकाम क्षेत्र.

दिनांक : ०६-०४-२०२६
ठिकाण : उलवे

प्राधिकृत अधिकारी
सेंट्रल बँक ऑफ इंडिया

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया / Central Bank of India — CENTRAL TO YOU SINCE 1911

नवीन पनवेल शाखा
दुकान क्रमांक ३,४,५,६ तुळसी आर्केड प्लॉट क्र. ७ सेक्टर ९ खांदा कॉलनी नवीन पनवेल रायगड महाराष्ट्र-४१०२०६

कब्जा सूचना (नियम ८(१)) स्थावर मिळकत करिता

याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार **सेंट्रल बँक ऑफ इंडिया चे** प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ ऑफ २००२) आणि कलम १३ (१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून सदर अधिनियमच्या कलम १३ (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, उक्त कायद्याच्या कलम १३ (२) अन्वये दिनांक **३०/१०/२०२३** रोजीस मागणी सूचना जारी करून **कर्जदार श्री. निपुण सौरभ शर्मा, मालक मे. एचएनजी ॲग्रो प्रॉडक्ट आणि मे. होप इंडिया व्हेंचर आणि हमीदार, श्रीमती मधुप्रीया सौरभ शर्मा -** यांना दुकान १-एच-१५, नील एम्पायर सीएचएस, सेक्टर-२५, नेरुळ पूर्व-४००७०६, तसेच येथे पत्ता : दुकान २, ई-५७, मसाला मार्केट, मार्केट १, फेज-२ एपीएमसी वाशी-४००७०५, तसेच दुकान नं. १० सत्य साई प्लाझा, सेक्टर ११, मिराज सिनेमाजवळ, न्यू पनवेल ईस्ट-४१०२०६ या पत्त्यावर असलेल्या व्यक्तीने सदर नोटीसमध्ये नमूद केलेली एकूण रक्कम **रु. ९९,१८,२४१.८४/- (रूपये नव्याणव लाख अठरा हजार दोनशे ऐकेचाळीस आणि चौऱ्याऐंशी पैसे मात्र)** या रकमेची परतफेड सदर सूचना प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यात सांगितले होते.

कर्जदार रकमेची परतफेड करण्यास कर्जदार आणि असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा **प्रत्यक्ष कब्जा** त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर ॲक्टच्या कलम १३ च्या उप-कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये या **०७ एप्रिल २०२६** रोजी घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा **सेंट्रल बँक ऑफ इंडिया,रु. ९९,१८,२४१.८४/- (रूपये नव्याणव लाख अठरा हजार दोनशे ऐकेचाळीस आणि चौऱ्याऐंशी पैसे मात्र) आणि त्यावरील व्याज.**

तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात सदर ॲक्टचे कलम (१३) चे उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेतले जाते.

मिळकतीचे वर्णन

(ए) फ्लॅट कम ऑफिस मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग, एफ-६ गौरी दर्शन सुपर सीएचएस बिल्डिंग सेक्टर ११, पेट्रोल पंपासमोर, न्यू पनवेल पूर्व, ता. पनवेल
जि. रायगड ४१०२०६ येथील मोजमापित ३५.३४ चौ. मीटर क्षेत्रफळाची फ्लॅट-कम-ऑफिस मालमत्ता, जी प्लॉट क्र. २, रोड क्र. १६, सेक्टर ११, न्यू पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे असलेल्या मोजमापित ५८६.२७ चौ. मीटर क्षेत्रफळाच्या एकत्रित भूखंडापैकी आहे आणि तिच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत:-

उत्तरेकडे किंवा उत्तरेला: प्लॉट क्र. ४, दक्षिणेकडे किंवा दक्षिणेला: पनवेल मार्थन रोड
पूर्वेकडे किंवा त्या दिशेने: भूखंड क्रमांक २७ जवळ, पश्चिमेकडे किंवा त्या दिशेने: रस्ता क्रमांक १६ जवळ

दिनांक : ०७-०४-२०२६
ठिकाण : नविन पनवेल

प्राधिकृत अधिकारी
सेंट्रल बँक ऑफ इंडिया

SBI भारतीय स्टेट बैंक / State Bank of India

होम लोन सेंटर, सांताक्रुझ, १ला मजला, जीवन सेवा ॲनेक्स बिल्डिंग, एलआयसी कॉम्प्लेक्स, एस.व्ही.रोड, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई-४०००५४ दूर.: ०२२-२६२६२३०६

ई-लिलाव सूचना

''जसे आहे तिथे'' आणि ''जसे आहे तसे'' या तत्त्वावर स्थावर मालमत्तेची

बँकेकडून जप्त करण्यात आलेली खाली नमूद केलेली मालमत्ता ''जसे आहे तिथे आहे'' आणि ''जसे आहे जे आहे'' तत्त्वावर विक्रीस ठेवण्यात आली असून, तिचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत:

कर्जदारांचे नाव	मिळकतीचे तपशील	किमान राखीव रक्कम रु. /लाख	ईएमडी रक्कम (१०%) रु.
श्री. कमलेश जैस्वाल	फ्लॅट क्र.४०४, ४था मजला, अनमोल रेसिडेन्सी, ए विंग, सर्व्हे क्र.३३, हिस्सा क्र.१४, गाव पिसावली, कल्याण पूर्व, ठाणे ४२१३०६	रु. २०,०७,०००/-	रु. २,००,७००/-

जर वरील संदर्भित तारण कर्ज (स्थावर मालमत्ता) पूर्णपणे न भरल्यास वरील नमूद कर्जदारांना विक्री आयोजित करण्यात येत असल्याबाबत ही देखील सूचना आहे.

अटी व शर्ती :

१. इच्छुक पक्षांनी या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून **२२.०४.२०२६ पर्यंत दररोज सकाळी ११:०० ते सायंकाळी ०५:०० या वेळेत** वर नमूद ठिकाणी मालमत्तेची पाहणी करू शकतात. (**संपर्क व्यक्ती : श्री संजय गडकर, /ओम एंटरप्रायझेस, रिझोल्यूशन एजन्सी, मोबाईल क्र. ९८९२५०७८१८.**
२. इच्छुक बोलीदारांनी प्रथम **http://baanknet.com** या पोर्टलवर नोंदणी करावी आणि बोली रक्कम पोर्टलच्या ई-वॉलेटमध्ये एनईएफटी/आरटीजीएस द्वारे जमा करावी (**http://baanknet.com**).
३. बोली **२२.०४.२०२६ (बुधवार) रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००** या वेळेत **http://baanknet.com** या पोर्टलवर उघडण्यात येईल. बोलीदारांना वेबसाइटवर निविदा उघडल्यानंतर बोली रक्कम वाढविण्याची संधी असेल.
४. राखीव किमतीखाली कोणतीही बोली स्वीकारली जाणार नाही.
५. यशस्वी बोलीदाराने लिलावाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत उर्वरित रक्कम अदा करणे आवश्यक राहील; अन्यथा इसारा अनामत रक्कम जप्त केली जाईल.
६. प्राधिकृत अधिकारी यांना कोणतेही कारण न देता बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा तसेच विक्री स्थगित/पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा पूर्ण अधिकार राहील. इतर अटी व शर्ती लागू राहतील.
७. ॲक्ट अंतर्गत नियम ८(६) नुसार वैधानिक सूचना : ही सरफैसी ॲक्ट, २००२ च्या नियम ८(६) अंतर्गत वरील कर्जाच्या कर्जदाराला/हमीदाराला वरील तारखेला तारण मत्तेच्या विक्रीसाठी लिलाव आयोजित करण्याबाबतची सूचना आहे.

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०७.०४.२०२६

मुख्य व्यवस्थापक, एचएल सेंटर सांताक्रुझ, स्टेट बँक ऑफ इंडिया

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २ मध्ये

एमटीएनएल भवन, ३रा मजला स्ट्रँड रोड, अपोलो बंदर, कुलाबा मार्केट, मुंबई-४०० ००५

मूळ अर्ज क्र. १५३ सन २०२६

सूचना

इंडियन बँक (ई-अलाहाबाद बँक). ...अर्जदार
विरुद्ध
सुबीर प्रबीर सामंता,
मे. आरन्ना एंटरप्रायझेस यांचे प्रोप्रायटर ...प्रतिवादी

ज्याअर्थी अर्जदाराने सरफैसी ॲक्ट, २००२ च्या कलम १३(१०) अंतर्गत **ओ.ए. क्र. १५३/२०२६** दाखल केला असून, त्यामध्ये सदर कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेची वसुली करून विक्रीतून मिळालेल्या रकमेचे समायोजन व उपयोजन केल्यानंतर **रु. १,६३,०१,४००/-** इतक्या दाव्याची मागणी तसेच त्यावरील व्याजासह करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी अर्जदाराने प्रतिवादी क्र. १ आणि ३ यांना नोटीस साधारण पद्धतीने बजावता न आल्यामुळे वृत्तपत्र प्रसिद्धीद्वारे नोटीस देण्याची परवानगी मिळविण्यासाठी आय.ए. क्र. २६६७/२०२६ दाखल केला असून, त्यानुसार पर्यायी सेवा करण्यासाठीचा अर्ज या न्यायाधिकरणाने दिनांक **२५.०३.२०२६** रोजी मंजूर केला आहे.

सूचित करण्यात येते की, वरील अर्जाची सुनावणी न्यायाधिकरणामार्फत दिनांक **२९.०४.२०२६** रोजी स. ११ वाजता किंवा त्यानंतर न्यायाधिकरणाच्या सोयीप्रमाणे तात्काळ घेतली जाईल.

आपणास याद्वारे निर्देश देण्यात येतो की, आपण वरील नमूद वेळ व स्थळी स्वतः किंवा विधिवत अधिकृत प्लीडर/वकील यांच्यामार्फत, प्रकरणानुसार, उपस्थित राहावे.आपण सुनावणीच्या दिवशी उपस्थित न राहिल्यास, अर्जाचा निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल.

माझ्या हस्ते आणि सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने **७ एप्रिल, २०२६** रोजी मुंबई येथे दिले.

सही /-
प्रबंधक,
डि.आर.टी. -II, मुंबई

शिक्का

प्रतिवादी क्र. १ आणि ३ यांचे नाव व पत्ता

१. सुबीर प्रबीर सामंता, मे. आरन्ना एंटरप्रायझेस या नावाने व शैलीने प्रोप्रायटर म्हणून व्यवसाय करीत, दुकान क्र. ३, निर्मला सदन, कार्टर रोड क्र. १, बोरीवली (पूर्व), मुंबई-४०००६६ येथे, **तसेच येथे:** ३ अरोमा, न्यू लिंक रोड, बिल्डिंग क्रमांक ३, ओशिवारा, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५८ येथे आणि राहणार: फ्लॅट क्रमांक ३८, ६ वा मजला, हरिद्वार टॉवर-२, एव्हरशाईन नगर, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४ ... **प्रतिवादी क्र. १**

२. समीर एम. दास, राहणार ए/९, ३०४, अनुराधा शांती नगर सीएचएस लि., शांती नगर, सेक्टर-६, मीरा रोड (पूर्व), जिल्हा-ठाणे-४०११०७ तसेच येथे: ३१२/२, निर्मल ज्योती बिल्डिंग, जवाहर नगर रोड क्रमांक १२, गोरेगाव (पश्चिम), मुंबई-४०००६२ आणि **तसेच येथे:** ३, अरोमा, न्यू लिंक रोड, बिल्डिंग क्र. ३, ओशिवारा, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५८ ... **प्रतिवादी क्र. ३**

जाहीर उद्घोषणा
ई-लिलाव विक्री सूचना
अनमोल स्टील प्रोसेसर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनातील)

परिसमापकाचा पत्ता: सीए कमल कुमार जादवानी, फ्लॅट क्र. ६०५, विंग-बी, सतगुरु कॉम्प्लेक्स II (ए-बी), फिल्म सिटी रोड, गोरेगाव पूर्व, सॅटेलाइट टॉवरच्या शेजारी, मुंबई, ४०००६३.
संपर्क क्र.: ७०४५५ ९४०३९ ईमेल आयडी: cirp.asppl@gmail.com

नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या कलम ३५(१)(एफ) सहवाचता आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) नियमावली, २०१६ च्या नियम ३३ नुसार, सूचना याद्वारे देण्यात येते की, परिसमापक कॉर्पोरेट कर्जदाराची मालमत्ता **''जसे आहे जिथे आहे'', ''जसे आहे जे आहे'', ''जेथे आहे तेथे आहे'' आणि ''विना अवलंब तत्त्वाने''** ई-लिलावाद्वारे विकण्याचा प्रस्ताव खाली नमूद केलेल्या तपशीलांनुसार ठेवत आहे.

मालमत्तेचा तपशील	
प्लॉट क्र. डी-११, गाव भागड औद्योगिक क्षेत्र, एमआयडीसी, विरचवाडी, माणगाव, जिल्हा रायगड, महाराष्ट्र-४१२२०८ येथे स्थित जमीन, ज्याचे जमिन क्षेत्र अंदाजे ३५,००० चौ. मी.	राखीव किंमत रू. ३,०५,००,०००/-
	ईएमडी :- रू. ३०,५०,०००/-

टीप:
१. ई-लिलाव प्लॅटफॉर्म: https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home
२. लिलावाची तारीख आणि वेळ: २४ एप्रिल, २०२६ (स. ११:३० ते दु. १२:३०)
३. ईओआय आणि ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख: २२ एप्रिल, २०२६ सायं. ०७:०० वा पर्यंत
४. बोली वाढ रक्कम: रू. १०,००,०००/-
५. मालमत्तेची तपासणी: परिसमापकाशी संपर्क साधून आगाऊ वेळ ठरविणे.

महत्त्वाच्या सूचना
१. संभाव्य बोलीदारांनी आयबीसी, २०१६च्या कलम २९ए, अंतर्गत पात्रतेची पुष्टी करणारे हमीपत्र सादर करावे.
२. इच्छुक पक्षांनी मालमत्ता आणि वैधानिक देयके याबाबत स्वतंत्रपणे तपासणी करावी.
३. भागधारकांच्या सल्लागार समितीशी सल्लामसलत करून, निविदेच्या पसंतीच्या संदर्भात परिसमापकाला पूर्ण अधिकार आहेत. अधिक स्पष्टीकरणासाठी कृपया निविदा दस्तऐवज पहा.
४. कोणतेही कारण न देता कोणतीही बोली किंवा प्रस्ताव रद्द करण्याचा, सुधारित करण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार परिसमापक राखून ठेवतो.
५. हे स्पष्ट केले आहे की हे आमंत्रण संभाव्य बोलीदारांना आमंत्रित करण्याचा आहे आणि विक्री करण्यासाठी परिसमापक किंवा कंपनीकडून कोणत्याही प्रकारचे बंधनकारक बंधन निर्माण करत नाही. प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा सुधारित करण्याचा आणि/किंवा कोणत्याही इच्छुक पक्ष/संभाव्य गुंतवणूकदार/बोलीदाराला कोणतेही कारण न देता आणि कोणतेही दायित्व न देता स्वीकारण्याचा आणि/किंवा अपात्र ठरवण्याचा अधिकार परिसमापक राखून ठेवतो.
६. ही विक्री सूचना ई-लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्ती असलेल्या निविदा दस्तऐवजासोबत cirp.asppl@gmail.com या ई-मेलद्वारे विनंती करून वाचली जाईल.
७. सर्व परिशिष्टांसह ईओआय कागदपत्रांची सॉफ्ट कॉपी cirp.asppl@gmail.com वर मेल करणे अनिवार्य आहे.

सही/-
सीए कमल कुमार जादवानी
परिसमापक - अनमोल स्टील प्रोसेसर्स प्रायव्हेट लिमिटेड
आयबीबीआय नोंदणी क्र. : आयबीबीआय/पीए-००१/आयपी-पी-०२७८६/२०२२-२०२३/१४२५९
एएफए वैधता: ३०-०६-२०२६ पर्यंत
मोबाईल: ७०४५५ ९४०३९
ईमेल: cirp.asppl@gmail.com

दिनांक: ०८-०४-२०२६
ठिकाण: मुंबई

ॲडोर वेल्डींग लिमिटेड

ador — peace of mind

नोंदणीकृत कार्यालय: ॲडोर हाऊस, ६, के. दुबाष मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१-१६. महाराष्ट्र, भारत
दू.: +९१ २२ ६६२३९३००/२२८४२५२५
ईमेल: investorservices@adorians.com
। **वेब:** www.adorwelding.com
सीआयएन: एल७०१००एमएच१९५१पीएलसी००८६४७

प्रत्यक्ष शेअर्सच्या हस्तांतरण आणि डिमटेरिअलायझेशनसाठी विशेष कक्ष

कंपनीच्या गुंतवणुकदारांना याद्वारे कळविण्यात येते की, ३० जानेवारी, २०२६ दिनांकित सेबी सर्क्युलर क्र. सेबी/एचओ/३८/१३/११ (२) २०२६ - एमआयआरएसडी-पीओडी/आय/३७५०/२०२६ नुसार ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी जे विकले/खरेदी केले होते त्या प्रत्यक्ष शेअर्सच्या हस्तांतरण आणि डिमॅट विनंत्यांच्या सोयीकरिता **०५ फेब्रुवारी, २०२६ पासून ०४ फेब्रुवारी, २०२७** पर्यंतच्या एका वर्षाच्या कालावधीसाठी एक विशेष कक्ष उघडण्यात आला आहे. विशेष कक्ष अशा हस्तांतरण विनंत्यांसाठी सुध्दा उपलब्ध असेल ज्या आधी सादर केल्या होत्या आणि दस्तावेज/प्रक्रियेतील त्रुटी/किंवा अन्य कारणाने फेटाळल्या/परत केल्या/दुर्लक्षि केल्या होत्या. ह्या कक्षांतर्गत हस्तांतरित होणारे शेअर्स फक्त डिमॅट स्वरूपात जमा केले जातील आणि ते हस्तांतरण नोंदणीच्या तारखेपासून एक वर्ष लॉक इन कालावधीच्या अधीन असतील.

कृपया नोंद घ्यावी की विशेष कक्षा अंतर्गत फक्त हस्तांतरण विलेख व अन्य पुष्ट्यर्थ दस्तावेजांसह मूळ शेअर प्रमाणपत्रांसोबतच्या विनंत्यांच विचारात घेतल्या जातील. उपरोक्त कालावधीत आमचे रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) कडे प्रत्यक्ष शेअर्सच्या हस्तांतरण विनंत्या पुढील पत्त्यावर पुन्हा सादर करता येतील.

एमयुएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
(पूर्वीची लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड)
सी-१०१, एम्बसी २४७, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००८३, महाराष्ट्र, भारत. दू.क्र.: +९१-२२-४९१८६०००
ई-मेल: Investor.helpdesk@in.mpms.mufg.com

ॲडोर वेल्डींग लिमिटेडसाठी
विनायक एम. भिडे
कंपनी सेक्रेटरी

७ एप्रिल, २०२६
मुंबई